

'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी घोषणा करणारे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांना पुण्यतिथी निमित्त अभिवादन


PTVA Schools

# दर्पण

For private circulation only




रक्षाबंधन म्हणजे बहिण-भावाच्या प्रेमाचे बंधन! या दिवशी बहिण भावाच्या हातावर राखी बांधून भावाचे हृदय प्रेमाने जिंकून घेते. हा सण म्हणजे पराक्रम, प्रेम, साहस किंवा संयमाचा संयोग होय.जगातील सर्व नात्यांमध्ये भाऊ-बहिणीचे प्रेम निस्वार्थी आणि पवित्र असते.


VOLUME: 02 | ISSUE : 06 | 8 PAGES July 2024


## संपादकीय

### युगपुरुष टिळक !

परम पूजनीय लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हे आपले स्वराज्य मार्गदर्शक, राष्ट्रगुरु ! १ ऑगस्ट रोजी त्यांच्या पुण्यतिथी दिवशी प्राथमिक शाळेपासून ते उच्च माध्यमिक शाळेपर्यंत बहुतेक सर्व शाळांमध्ये महाराष्ट्र तसेच इतरत्रही टिळक पुण्यतिथी आदराने, श्रद्धेने विद्यार्थ्यांवर सुसंस्कार करण्याच्या उद्देशाने साजरी केली जाते.



श्री.गणपत हाक्के
मुख्याध्यापक

टिळकांना विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधायचा होता. विद्यार्थ्यांना सर्व कलांत पारंगत करायचे होते. एकदा न्यू इंग्लिश स्कूलच्या मॅट्रिकच्या वर्गाच्या शिक्षकांनी आपापल्या तासांना विद्यार्थ्यांना शिमग्याच्या सुट्टीसाठी भरपूर अभ्यास नेमून दिला. शेवटचा तास टिळकांचा होता. त्यांच्या वरिष्ठांनी त्यांनाही मुलांना त्यांच्या विषयाचा अभ्यास देण्यास सांगितले. त्यावर टिळकांनी स्पष्ट उत्तर दिले. "सुट्टी ही अभ्यासाकरता नसते; खेळण्याकरिता असते. त्या खेळण्याने अंगाला माती लागली तरी हरकत नाही; कारण माती धुवून निघेल; पण मन दुर्बल, निरुत्साही झालं, तर त्या मनुष्याचा कुठेच उपयोग होत नाही. तो विद्वान असूनही व्यर्थ. माझं सांगणं आहे की सुट्टी ही खेळ व करमणूक करून मन ताजंतवानं व अभ्यासक्षम करण्यासाठी आहे. म्हणून घर कोंबड्यासारखे घरी बसून राहू नका. मनमुराद खेळा व उत्साही मनाने पुनः शाळेत या ".

स्वातंत्र्य मिळवण्यासाठी अनेक थोर देशभक्तांनी फार मोठा त्याग केला. ज्यांच्या त्यागातून स्वातंत्र्यासाठी लढण्याची प्रेरणा आपल्याला मिळाली अशा महान नेत्यांपैकी लोकमान्य टिळक हे एक श्रेष्ठ आणि झुंजार नेते होते. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे की आणि तो मी मिळवणारच" अशी सिंहगर्जना करून लोकमान्य टिळकांनी आपल्या देश बांधवांना जागे केले आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांचा थरकाप उडवला. परकीय राजवटीबद्दल लोकांच्या मनात असंतोष निर्माण केला आणि त्यांना निर्भय बनवले. लोकमान्य टिळकांचे तेजस्वी जीवन, त्यांची उत्कट देशभक्ती, मोठी विद्वत्ता आणि उज्वल चारित्र्य यामुळे आजही आपणांस सतत स्फूर्ती मिळते. अशा या महान नेत्याला विनम्र अभिवादन !

**- श्री.गणपत हाक्के, मुख्याध्यापक, परांजपे विद्यालय, मराठी माध्यम, माध्यमिक शाळा अंधेरी**

# पाटिविअच्या संचालक मंडळ सदस्य मा. डॉ. स्नेहलता देशमुख यांचे दु:खद निधन

**मुंबई विद्यापीठाच्या माजी कुलगुरू, पार्ले टिळक विद्यालय संस्थेच्या संचालक मंडळ सदस्य डॉ. स्नेहलता देशमुख यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी सोमवार २९ जुलै २०२४ रोजी सकाळी विलेपार्ले येथे राहत्या घरी दुःखद निधन झाले.**



गेली दीड वर्षे त्यांची प्रकृती बरी नव्हती. पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या संचालक सदस्या म्हणून त्यांनी गेली १५ वर्षे पाटिविअ परिवाराला मार्गदर्शन केले. विद्यार्थी, शिक्षक आणि सर्व कर्मचाऱ्यांची आठवणीने आणि आपुलकीने त्या चौकशी करत. त्यांचा प्रेमळ स्वभाव, गोड वाणी आणि विविध विषयांचा गाढा व्यासंग यामुळे त्या सर्वांना प्रिय होत्या. डॉ. स्नेहलता देशमुख या मुंबईतील सायन येथील लोकमान्य टिळक रुग्णालयाच्या अधिष्ठात्या होत्या. १९९५ मध्ये त्यांची मुंबई विद्यापीठाच्या कुलगुरू म्हणून नियुक्ती झाली. आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी अनेक धडाडीचे आणि महत्त्वाचे निर्णय घेतले होते. त्यातील एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे विद्यापीठाच्या पदवी प्रमाणपत्रावर त्या विद्यार्थ्याच्या किंवा विद्यार्थिनीच्या वडिलांच्या नावाप्रमाणे आईचेही नाव लिहिणे.

गर्भसंस्कार तंत्र आणि मंत्र, तंत्रयुगातील उमलती मने, अरे संस्कार संस्कार इत्यादी विविध विषयांवरील सुमारे १७ पुस्तकांचे लेखन त्यांनी केले आहे. गर्भसंस्कार, नवजातशिशू आणि मातांचा आहार या विषयांवर त्यांनी विशेष काम आणि लिखाण केलं आहे. एक अभ्यासू, सेवाभावी व्यक्तिमत्त्व म्हणूनही त्यांच्याकडे पाहिलं जातं. स्नेहलता देशमुख यांनी बालशल्यचिकित्साची पायाभरणी केली. बालरोगतज्ज्ञ म्हणून डॉ.स्नेहलता देशमुख सुप्रसिद्ध होत्या. त्यांच्या सामाजिक कार्यासाठी त्यांना 'डॉ. बी.सी. रॉय पुरस्कार', 'धन्वंतरी पुरस्कार', हे पुरस्कार मिळाले होते.

डॉ. स्नेहलता देशमुख सुरूवातीपासूनच अतिशय हुशार विद्यार्थिनी असल्याने त्यांना जी.एस.वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळाला. एम.बी.बी.एस. ला त्या सर्व विद्यार्थ्यांमध्ये सर्व विषयात प्रथम आल्या. यानंतर त्यांनी जी.एस. मध्ये अर्भकांवरची शस्त्रक्रिया या विषयात शिक्षण घेण्याचा निर्णय घेत प्रवेश घेतला. यात एक प्रसिद्ध शल्यविशारद म्हणून त्यांनी ओळख मिळवली. विविध क्षेत्रातील मातब्बर मंडळींशी त्यांचे अतिशय जवळचे संबंध होते. अनेक सामजिक संस्थांच्या माध्यमातून त्या शेवटपर्यंत समाजसेवा करीत राहिल्या. रसिक, लोभस आणि विद्वत्तेचे दैवी देणं लाभलेलं ऋषितुल्य व्यक्तिमत्व आता काळाच्या पडद्याआड गेलं आहे.

पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेच्या तसेच अंधेरीतील पाटिविअ इंग्लिश मिडीयम अंधेरी या शाळेच्या उभारणीत आणि विकासात त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका निभावली. त्यांच्या कुटुंबीयांना, मित्रपरिवाराला आणि संपूर्ण पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन परिवाराला त्यांची उणीव कायम भासत राहील. त्यांच्या आत्म्याला शाश्वत शांती लाभो. ॐ शांती, ॐ शांती, ॐ शांती

पा. टि. वि. अ. परिवारा तर्फे

## ।। भावपूर्ण श्रध्दांजली ।।



### स्व. डॉ. स्नेहलता देशमुख

सदस्य, संचालक मंडळ
पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन
माजी कुलगुरु, मुंबई विद्यापीठ

मृत्यू - दि. २९ जुलै २०२४

# Worshipping Gurus

**PTVEMS (Primary) celebrated Guru Purnima on July 19. On this day, gurus (teachers) are worshipped and respected. Music teacher Mrs Monali Ambekar shared the importance of this day.**

The students of Std. IV sang the melodious song “गुरुने दिला ज्ञानरूपी वसा, आम्ही चालवू हा पुढे वारसा!!” Besides, the school display boards were decorated with images and write-ups amplifying the significance of the day.

**- Mrs Monali Ambekar, Music teacher, PTVEMS (Primary)**



# Respecting and Appreciating teachers

*"Some people change the world. And some people change the people who change the world, and that's you."*
*- Kij Johnson*



Teachers are our role models from the very beginning of our lives. They create positivity and motivation in every aspect of our journey. They develop our ability to make decisions, enhance problem-solving skills, and strengthen us both mentally and physically. We learn discipline and amiable behaviours from our teachers. They never let us feel distant from our parents during school hours. Despite many commitments in the school and social arena, they never fail to address our doubts and share their valuable thoughts with us. We should always be polite in our behaviour when interacting with them.

It is our moral and social responsibility to always respect and appreciate our teachers because they are the main workforce behind shaping the country's future. We should always appreciate our teachers so that they can find inspiration and encouragement for their noble profession.

So, friends, ensure to respect all your teachers, and never miss any opportunity to thank them.

**- Debayani Basu (Std. V D), PTV (ICSE)**



**नेपाळ येथे पार पडलेल्या 15 व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा चॅम्पियनशिपमध्ये पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेतील इयत्ता तिसरी मधील विद्यार्थिनी परी नथुराम ठाकूर हिने चमकदार कामगिरी करत एक रौप्य व एक कांस्यपदक पटकावले.**

# नशामुक्त भारत पंधरवडा



नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो म्हणजे एनसीबी या संस्थेने १२ ते २४ जून यादरम्यान 'नशामुक्त भारत पंधरवडा' जाहीर केला. अमली पदार्थांच्या (ड्रग्स च्या) दुष्परिणामांबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा उद्देश असून पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभागात २६ जून रोजी विलेपार्ले पूर्व पोलीस स्टेशनचे सहाय्यक इन्स्पेक्टर बसवराज तमशेट्टये यांनी चलचित्राद्वारे विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे दुष्परिणाम तसेच या व्यसनातून बाहेर पडण्याचे उपाय समजावून सांगितले. तसेच त्या संदर्भातील कायद्याची थोडक्यात माहिती त्यांनी दिली. विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाने 'मी भारताचा सुदृढ नागरिक होण्याचा प्रयत्न करेन' अशी प्रतिज्ञा घेतली. तसेच या व्यसनांपासून वेळेत सावध व्हा अशा आशयाच्या घोषणा देत एक रॅली देखील काढण्यात आली.



## नागपंचमी

श्रावण महिन्यातील पहिला सण नागपंचमी. या दिवशी घरोघरी नागाची पूजा करतात. दूध लाह्यांचा नैवेद्य दाखवतात. हा सण स्त्रिया मोठ्या उत्साहाने साजरा करतात. अजूनही झाडाला झोके बांधून खेळ खेळला जातो. नाग शेतकऱ्यांचा मित्र आहे. नाग शेताची नासाडी करणाऱ्या उंदरांचा नायनाट करतो. पार्ले टिळक प्राथमिक विभागात नागपंचमी साजरी केली जाते. त्यात मातीचे, कागदाचे, रबराचे नाग असतात. विद्यार्थी स्वतः मातीपासून नाग बनवतात. काहीजण मातीच्या नागाची मूर्ती आणतात. उत्तम प्रकारे सजावट केली जाते. इयत्ता पहिलीचे विद्यार्थी नागपंचमीच्या दिवशी पारंपारिक वेशभूषा करून येतात व पारंपारिक खेळ खेळतात.

**-श्रीमती हर्षदा हरिश्चंद्र चव्हाण, मुख्याध्यापिका, पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळा**

# PTVA Schools enjoy ceremonial celebrations of Ashadhi Ekadashi

**PTVA schools celebrated Ashadhi Ekadashi on July 16 with fervour. The Primary Section students of PTV (ICSE) commemorated the occasion with cultural performances highlighting rich traditions. Similarly, the Secondary Section of PTV (ICSE) gathered for a grand celebration. The students from Grades 6 to 10 sang soulful Kirtan, Bharud and Abhangas.**

At PTVEMS (Primary), the programme commenced with chanting the name of 'Lord Vitthala.' The students were dressed as 'Warkaris.' Teacher Mrs Monali Baviskar explained the importance of this auspicious day. Later, all the attendees sang Vitthal aarti. It was followed by Arnesh Khare's (Std. IV C) speech on Varkari Sampradaya. The celebrations culminated with a 'Dindi Sohala' (procession).



**PTVEMS - Primary**




**PTV (ICSE) - Primary**




**PTV (ICSE) - Secondary**

# गुरुपौर्णिमेचे महात्म्य

गुशब्दस्त्वन्धकारः स्यात् रुशब्दस्तन्निरोधकः ।
अंधःकार निरोधित्वात् गुरुरित्यभिधीयते ।।
-अदवय तारक उपनिषद

संस्कृत मध्ये 'गु' या शब्दाचा अर्थ अंधार समजला जातो आणि 'रु' या शब्दाचा अर्थ अंधाराला दूर करणारा असा समजला जातो. अर्थात, अज्ञानाच्या अंधाराला दूर करून ज्ञानाच्या मार्गावर जो मनुष्याला नेतो, जो मनुष्याला घडवतो, तो म्हणजे गुरु.

आपल्या आयुष्यातील सर्व गुरूंच्या प्रती आपली कृतज्ञता व आपले आभार व्यक्त करण्यासाठी आपण गुरुपौर्णिमा साजरी करतो. हजारो वर्षांपूर्वी भगवान शिवांनी सप्तऋषींना योग व सिद्धीचे ज्ञान दिले, असे मानले जाते. गुरुपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असे सुद्धा म्हटले जाते. वेदव्यास भारतातील प्रख्यात गुरुंपैकी एक. त्यांनी त्यांच्या वंशजांच्या आयुष्यावर आधारित 'महाभारत' हे महाकाव्य रचले. याच वेद व्यासांनी आपल्या पुराणातल्या गोष्टी १८ पुराणांमध्ये विभाजित केल्या. याच दिवशी वेद व्यासांचा जन्म झाला आणि ह्याच दिवशी अनेक वर्षानंतर त्यांनी आपल्या शिष्यांना व इतर ऋषीमुनींना श्री महाभागवत पुराणाचे ज्ञान दिले म्हणून त्यांच्या शिष्यांनी हा दिवस 'व्यासपौर्णिमा' म्हणून साजरा करायचा असे ठरवले.

मनुष्याच्या आयुष्यात योग्य तो गुरु आला तर तो मनुष्याला सफल करण्यात व घडवण्यात महत्त्वपूर्ण भूमिका निभावतो. गुरू फक्त विद्यालय किंवा विद्यापिठात धडे शिकवणारा नाही तर गुरुची व्याप्ती ही अधिक आहे. सृष्टीतल्या प्रत्येक जीवात, प्रत्येक वस्तूत मनुष्याला गुरुची अनुभूती येऊ शकते. स्वतः श्री गुरुदत्तात्रेय त्रैमुर्तीचा अवतार असून त्यांचे चोवीस गुरु आहेत. यातून आपल्याला शिकवण मिळते की कितीही मोठे व्यक्तिमत्व असले तरीही त्यांनी अहंकाररहित दृष्टिकोनाने आपल्या आजूबाजूच्या लोकांकडून, वातावरणातून नेहमीच शिकत राहावे. ज्ञान मिळवत राहावे. कोणीही तुच्छ किंवा उच्च नाही. प्रत्येकाकडून काही ना काहीतरी शिकण्यासारखे असतेच. आपल्या संस्कृतीत गुरूला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आई-वडिलांनंतर गुरुचे स्थान असते. अशा या गुरूंना माझे त्रिवार वंदन!!



**- वेदांग कस्तुरे (इयत्ता १० वी ब) पार्ले टिळक विद्यालय आयसीएसइ**

# Say No to Plastic

**World Paper Bag Day was observed on July 12 in PTVA's EMS, Andheri. Green Army soldiers of Grade VI conducted a special assembly under the guidance of teacher Mrs Pratiksha Parshekar. The aim was to spread awareness of the harmful impact of plastic on the environment and promote paper bag usage. Paper bags are the perfect eco-friendly alternative to non-biodegradable plastic bags.**



On this occasion, Shlok Karande gave a speech on the worldwide celebration of Paper Bag Day, Kirti Gupta explained the ecological benefits of using paper bags over plastic bags, and Kshitij Shinde recited the poem "POLYBAGS."

Students of grade VII Nivida Mondkar, Ritika Savardekar, and Hrithika Zore presented an impactful song "प्लास्टिक टीक ना पाये रे." Students of grades V, VI, VII, and VIII and the teachers enthusiastically prepared and decorated attractive paper bags using old newspapers, wrote slogans, and pledged to use them over plastic bags.

**- Mrs Pratiksha Parshekar, Asst. Teacher, PTVA's EMS, Andheri**

# Upcycle Today for a Better Tomorrow...

**Eco Club of PTVA's EMS, Andheri, organised orientation sessions for the students under the guidance of Environment activist Mrs Rashmi Joshi on June 28. Grade VII and VIII students participated in the Plastic Upcycling workshop, where they were explained that plastics in various forms are non-biodegradable. Upcycling of plastic is the creative reuse of transforming plastic waste materials into new materials of environmental value. The students were given a demonstration of making eco-bricks, and they were encouraged to prepare the same and ideate various projects using eco-bricks.**



In another session with grades IV, V, and VI students, the resource person explained the scientific method of collecting and storing seeds of different vegetables and fruits to grow new plants from the gathered seeds. Students were encouraged to collect and preserve seeds to be submitted to the school, which will be handed to the farmers. Science teacher Ms Shweta Yadav handed Mango and Litchy seeds she collected to Mrs Rashmi Joshi.

**- Ms Shweta Yadav, Asst. Teacher, PTVA's EMS, Andheri**

# PTVEMS students ring in Van Mahotsav week

**The Primary and Secondary Sections of PTVEMS celebrated Van Mahotsav in the first week of July. Van Mahotsav is a tree-planting festival started by K. M. Munshi in 1950 to create enthusiasm among the masses for forest Conservation and planting trees.**

PTVEMS (Primary) commemorated this week with enthusiasm. All the students and teachers actively participated in the programme. The school's headmistress and supervisor planted saplings. Teacher Fanny Pereira explained the importance of trees to the students. The students narrated stories in Hindi and Marathi and also recited poems. Std. III students prepared slogans, and likewise, Std. IV students made posters on the theme 'Save trees'. Videos emphasising the importance of saving trees were shown to the students. Besides, the seed bomb activity was done by students at Std. I and II. Poems and





articles related to the topic were displayed on the display board.

Similarly, at PTVEMS (Secondary), the Young Explorers Nature Club members observed the Van Mahotsav week. The week-long series of events commenced with an enriching talk by Narmata Patil (Std. IX C). On July 2, a nature walk was organised for Nature Club Members of Std. IX in Sathaye College. Mrs Renee Vyas, a practising naturalist, familiarised the students with the various types of trees and plants. A series of other educational activities further enriched the week's festivities. One such activity featured a meaningful Marathi song presented by Abhidnya Pednekar (Std. VI A), appreciating nature's bounty. Further, a sapling plantation workshop was conducted by Nature Club Members and Nature Club advisor Mr Kalpesh Satra on July 4. Later, to encourage and inspire students to contribute towards sustainable agriculture, a Seed Collection Drive was organised on July 5 under the guidance of Mrs Rashmi Joshi, an Environment Consultant. In a month, the students would deposit the seeds collected, which will be given to the farmers. A vibrant fancy dress competition was also conducted for the students of Std. VI, based on the theme - 'Plants and their uses.' Mrs Sadhana Kamerkar and Mrs Beena Godambe judged the competition. Vivan Poojari (Std. VI D) won the first prize, Shraddha Lad (Std. VI B) and Aayushi Walve (Std. VI A) earned the joint-second place, Samarth Sukhthankar (Std. VI A) bagged the third position, and Abhidnya Pednekar (Std. VI A) received the consolation prize.

# संवाद प्रज्ञावंतांशी

## बुद्धिबळपटू श्री. व सौ. रघुनंदन गोखले यांच्याशी गप्पा

श्री.रघुनंदन गोखले व सौ. अनुपमा गोखले ही बुद्धिबळ या खेळात नावाजलेली व्यक्तिमत्त्व! अनुपमा गोखले या दोनवेळा शिवछत्रपती पुरस्कार, दोनवेळा एशियन चेस चॅम्पियनशिप, दोनवेळा शिवछत्रपती पुरस्कार, पाच वेळा वुमेन्स चेस चॅम्पियनशिप व अर्जुन पुरस्कार प्राप्त बुद्धिबळपटू आहेत. तसेच त्यांना 'पद्मश्री' या किताबाने गौरवण्यात आले आहे. तर रघुनंदन गोखले द्रोणाचार्य पुरस्कार व महाराष्ट्र गौरव पुरस्कारप्राप्त तर आहेतच पण स्पोर्ट्स जर्नालिस्टस् असोसिएशनतर्फे त्यांना लाइफटाइम अचीव्हमेंट अवॉर्ड मिळाला आहे. सरांनी बुद्धिबळ खेळासंदर्भात केलेली विशेष गौरवास्पद कामगिरी म्हणजे त्यांनी अंध विद्यार्थ्यांसाठी ऑल इंडिया चेस फेडरेशन फॉर द ब्लाइंड (AICFB) या संस्थेची निर्मिती केली आणि त्यात ते गेली तीस वर्षे मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. अशा या परांजपे विद्यालयाचे माजी विद्यार्थी असलेल्या देवतुल्य प्रज्ञावंत पती-पत्नींना भेटण्याचा व त्यांच्याशी संवाद साधण्याचा योग पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या शाळेतील दहावीचा विद्यार्थी सार्थक निम्बुर्गे व संस्कृत शिक्षिका दुर्वा कंटक यांना आला.

**सार्थक :** सर, तुम्ही बुद्धिबळ खेळण्यास साधारण कधी सुरुवात केली आणि तुम्हाला कोणाचे मार्गदर्शन मिळाले?

**गोखले सर :** घरातील भावंडं, मित्र मंडळ यांच्यासोबत खेळून सराव झाला. १९७२ मध्ये परांजपे शाळेतील आंतरशालेय सामना प्रथम खेळलो व नंतर पार्ले कॉलेज (सध्याचे साठ्ये कॉलेज) तर्फे सामना खेळलो. त्याकाळी आतासारखे कोचिंग वगैरे नव्हते. स्वतः सराव करून शिकत गेलो.

**गोखले मॅडम:** मला मात्र शाळेपासून सरांचे मार्गदर्शन मिळाले. शाळेत सात मुले आणि मी एकटीच मुलगी या खेळात सहभागी होतो. नॅशनल इंटरस्कूल खेळायला प्रथम नागपूरला गेले.

**सार्थक:** शालेय जीवनात बुद्धिबळाची गोडी जोपासताना अभ्यासात त्याचा काही फायदा झाला का?

**गोखले सर :** बुद्धिबळ या खेळाचा निश्चितच चांगला फायदा होतो तो म्हणजे स्मरणशक्ती वाढवण्यास आणि लक्ष केंद्रित करण्यास. कोणत्याही आव्हानाला न घाबरता सामोरे जाता येते. खेळत असताना एखाद्या क्षणी मनावर दडपण आलंच तर मन स्थिर आणि शांत ठेवायचं कसं हेही सरावाने शिकता येतं.



**गोखले मॅडम :** योग्य वेळी योग्य पर्याय निवडून खेळणं, प्रसंगावधान राखणं हे परीक्षेसारखंच या खेळातही खूप आवश्यक आहे आणि त्याकरिता रोज योग केला पाहिजे, ज्याचा उपयोग मुलांना परीक्षा काळातही होऊ शकतो.

**दुर्वा कंटक:** मॅडम, क्रिकेट या खेळाची जशी प्रसिद्धी आहे तशी या खेळाची आहे का आणि मुलींचा या खेळात किती सहभाग दिसतो?

**गोखले मॅडम :** हो, या खेळालाही प्रेक्षकांची, चाहत्यांची भरपूर गर्दी असते. १९५ देशांमध्ये या खेळाचे सामने होतात. फुटबॉल खालोखाल बुद्धिबळ खेळणारे सर्वात जास्त देश आहेत. मी जवळजवळ ३५ देशात जाऊन भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. सर देखील दरवर्षी कोचिंगसाठी कॉमेंट्री करण्याकरिता देश-विदेशात जातात. पण मुलींचा सहभाग म्हणावा तसा या खेळात आढळत नाही.



**सार्थक :** या खेळासंदर्भात काही लेखी परीक्षा वगैरे असतात का?

**गोखले मॅडम:** नाही, परीक्षा नसतात पण तुम्हाला तुमची मूव्ह लिहून ठेवावी लागते. त्याचा फायदा असा होतो की नंतर तुमचा गेम तुम्ही ॲनलाइज करू शकता. त्या चुका टाळू शकता.

**गोखले सर:** अगदी वर्ल्ड चॅम्पियनला सुद्धा त्याची मूव्ह लिहून ठेवावी लागते.

**दुर्वा कंटक:** पद्मश्री पुरस्कारासाठी त्यावेळी काही नामांकन पाठवणे, फॉर्म भरणे अशी पद्धत होती का?

**गोखले मॅडम:** एशियन चॅम्पियनशिप दोन वेळा जिंकल्यामुळे आणि इंदिरा गांधी ट्रॉफी मिळाल्यामुळे मला वाटतं सरकारला माझ्या या खेळाचे विशेष कौतुक वाटले असावे व त्यामुळे त्यांच्याकडूनच हा पुरस्कार घोषित झाला. मी काही खटपट केली नव्हती.

**दुर्वा कंटक:** सर, अंध विद्यार्थ्यांसाठी तुम्ही AICFB या संस्थेची निर्मिती केली. त्याची प्रेरणा कुठून मिळाली आणि त्यांना शिकवण्याचं काही खास तंत्र आहे का?

**गोखले सर:** स्पेनमध्ये मी गेलो असताना तेथील काही अंध विद्यार्थ्यांना मी हा खेळ खेळताना पाहिले आणि लगेच तेथील मुख्य कार्यालयात जाऊन स्वखर्चाने २०० डॉलर भरून रजिस्ट्रेशन केले. प्रेसिडेंट म्हणून सही केली. माझ्या बरोबरच्या सहकाऱ्यांच्या वेगवेगळ्या पदांवर सह्या घेतल्या आणि भारतात येऊन १९९५/९६ मध्ये या संस्थेची स्थापना झाली.

अंध विद्यार्थ्यांसाठी चेसबोर्ड वेगळा असतो. त्यांना या सोंगट्या बोर्डवर खोचायच्या असतात. पांढऱ्या सोंगट्यांना खालच्या बाजूला खिळा असतो तर काळ्या सोंगट्यांना वरच्या बाजूला असतो. त्यामुळे स्पर्शज्ञानाने त्यांना सोंगटी ओळखता येते. त्यांना एक मदतनीस असतो जो समोरच्याची मूव्ह सांगू शकतो. पण सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे या अंध विद्यार्थ्यांचा सामना डोळस विद्यार्थ्यांबरोबरच असतो. त्यांच्या इतर खेळांप्रमाणे वेगळ्या मॅचेस् होत नाहीत. गेल्या आठवड्यात आळंदी येथे काही सामने खेळले गेले ज्यात २०० हून अधिक अंध विद्यार्थी सहभागी झाले होते.

# PTVEMS (Primary) celebrates its 43rd Foundation Day




**PTVEMS Primary Section celebrated its 43rd Foundation Day on June 28. On this day, the entire school got the opportunity to reflect on the beginnings of the PTVEMS and its founders and the significant developments since the school's inception.**

Teacher Komal Yevle delivered an eloquent speech on Foundation Day. Later, through her words of wisdom, the school's headmistress Mrs Kalpana Kalekar emphasised the importance of staying up-to-date and keeping the school's flag flying high with hard work and dedication towards the school's progress.

The day concluded with a pledge and assurance that the teachers and students, with parents' support, would keep setting new benchmarks with every passing year. The school's Drawing teacher displayed photos of school members from previous years and decorated the display board. Chocolates were distributed amongst the students, teachers and the non-teaching staff.

**- Mrs Komal Yevle, Asst. Teacher, PTVEMS Primary Section**

# A big thank you to all the Doctors!

**On July 1, PTVEMS (Primary) celebrated Doctor's Day to honour the remarkable contributions of Bharat Ratna awardee Dr Bidhan Chandra Roy, who was regarded as one of the best physicians of his time. July 1 marks the birth and death anniversary of Dr Roy.**



Students wrote slogans and made first aid boxes. All the EVS teachers teaching Std. III planned the activities. Ms Olivia Falcao (Class teacher of Std III B) delivered a speech on this occasion.

Dr Amruta Kalubarme, a homoeopathic doctor and a parent of a student studying in Std. II A, briefed the students about the uses and importance of medicinal herbs like ginger, tulsi, honey, asafoetida and turmeric.



Tejasvi Oke and Vishwesh Raul



Lucas Kenny

**The PTVEMS (Primary) students advanced to the second level of Science Olympiad Foundation (SOF) and won certificates of merit. In the International English Olympiad, it was Tejasvi Oke (Std. III D), and in the International Maths Olympiad, it was Vishwesh Raul (Std. III A) who received certificates. Lucas Kenny (Std. IV B) excelled in both the exams.**

# पार्ले टिळकच्या शाळांमध्ये आषाढी निमित्त दुमदुमली पंढरी

**पार्ले टिळक असोसिएशनच्या पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक, माध्यमिक, परांजपे विद्यालय प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत त्याचप्रमाणे पार्ले टिळक विद्यालयाच्या अंधेरी येथील इंग्लिश मिडीयम शाळेतही आषाढी एकादशी निमित्त विविध कार्यक्रम आयोजित केले होते. विद्यार्थ्यांनी सहभागी होत आषाढी एकादशी उत्सव साजरा केला.**

पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमाच्या माध्यमिक विभाग शाळेत पालखी तुळशीमाळांनी सजली होती, फळ्यावर विठूमाऊली व तिची वारकरी लेकरे श्री. वानखेडे सरांच्या कुंचल्यातून अवतरली होती. शालेय वारीची सुरुवात ध्वनिक्षेपित कार्यक्रमाने झाली. आषाढी एकादशीचा पौराणिक संदर्भ देऊन विद्यार्थ्यांना वारीपरंपरेविषयी माहिती सांगून कुलकर्णी बाईंच्या मार्गदर्शनाखाली अभंग, गाणी सादर करून कार्यक्रम सादर झाला. शिक्षक अजय पाटील यांनी पांडुरंगाला साकडं घातलं.

परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेत सौ. बर्वे यांनी संगीतमय कार्यक्रमाद्वारे आषाढी एकादशीचे महत्त्व विशद केले. मुख्याध्यापक श्री. हाक्के यांच्या हस्ते विठ्ठल - रखुमाईंच्या विधिवत पूजेनंतर विठ्ठल रखुमाई व वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी विद्यालयाच्या परिसरातच दिंडी काढली. शाळेच्या वाङ्मय मंडळातर्फे काव्यवाचन व कथाकथन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. परांजपे विद्यालय प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशात आषाढी एकादशीच्या निमित्ताने वृक्षदिंडी काढली. दिंडीद्वारे निसर्ग संवर्धनाची हाक देण्यात आली.

पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक विभागातर्फे आषाढी एकादशीच्या निमित्ताने पालखी सजवण्यासाठी इयत्ता चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांनी व्यवसायाभिमुख उपक्रमांतर्गत फुलांचे हार, तोरण स्वतः कलात्मक रीतीने बनवले. ध्वनिक्षेपित कार्यक्रमातून आषाढी एकादशीची माहिती सांगण्यात आली. शाळेच्या परिसरात दिंडी काढण्यात आली होती. मुख्याध्यापिका हर्षदा चव्हाण यांनी पालखीचे पूजन करून दिंडीचा श्रीगणेशा केला.

पार्ले टिळक विद्यालयाच्या अंधेरी येथील इंग्लिश मिडीयम शाळेतही आषाढी एकादशीनिमित्त पारंपारिक दिंडी काढण्यात आली. शाळेच्या सभागृहात रंगलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात मुख्याध्यापिका मृणालिनी म्हेत्रे यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची आरती करण्यात आली. शाळेतील शिक्षिका स्वाती बापट यांनी विद्यार्थ्यांना आषाढी एकादशीचे महत्त्व सांगितले. इयत्ता चौथीतील कैवल्य गोकर्णकरने अभंग सादर केला. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनींनी भारुड सादर केले. दोन्ही कार्यक्रमांसाठी संगीत शिक्षिका काव्या राणे यांनी मार्गदर्शन केले. यानंतर 'गजर माऊलीचा' हा नृत्यविष्कार इयत्ता पाचवी, सहावी व आठवीतील विद्यार्थ्यांनी सादर केला. यासाठी शिक्षिका चरिता कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. दरवर्षी पंढरपूरला जाणाऱ्या वारीतील अनेक रोचक गोष्टींचे वर्णन करणारा 'What is Wari?' हा व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखवण्यात आला. इयत्ता आठवीतील पिनाक पटवर्धन या विद्यार्थ्याने वारकरी कीर्तन सादर केले.



परांजपे विद्यालय माध्यमिक शाळा



परांजपे विद्यालय प्राथमिक विभाग, अंधेरी



PTVA's EMS, Andheri



पार्ले टिळक मराठी माध्यम प्राथमिक विभाग



पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यमिक विभाग

# The new council takes charge

**PTVEMS (Primary) announced its new council for the academic year 2024-25 on July 1. The investiture ceremony was held in the school hall.**

The selected council members, including the Head Boy, the Head Girl, the Commanders for each house, along with Vice-commanders and Prefects, were conferred with badges and sashes by the school's headmistress Mrs Kalpana Kalekar, and Supervisor, Mrs Sunita Bhagwat.

The Head Boy, the Head Girl, and the other school council members pledged to uphold the school's values, maintain discipline, and serve as role models for their peers.

The headmistress congratulated the elected team and reminded them that with power comes responsibility towards themselves, their school, and their peers. She advised them to be role models for their peers.

**- Mrs Kamakshi Kulkarni, Class teacher of Std. IV C, PTVEMS**

# Igniting a sense of pride and patriotism on Kargil Vijay Diwas

**On Kargil Vijay Diwas, a video featuring Indian Armed Forces speakers was shown to all PTV (ICSE) students. The first speaker was Captain Sandeep Marathe, an alumnus of PTV (Marathi Medium). Over his 26-year career, he served on various Navy ships, at Naval Headquarters, and as Defence Advisor in Singapore. Currently, he commands the Indian Naval Ship Beas. He encouraged students to consider defence careers and emphasised incorporating values to become responsible citizens.**

The next speaker, Colonel Sachin Nimbalkar, served in challenging environments and was awarded the Vir Chakra for bravery during the Kargil War. He also participated in UN Peacekeeping Operations and commanded the 20th Battalion of the Grenadiers Regiment at Siachen Glacier. Currently, he serves as Group Commander at NCC, Warangal. He recounted the role of the 18 Grenadiers in capturing Tiger Hill and paid tribute to the soldiers who sacrificed their lives.

Their stories inspired the students, igniting a sense of patriotism and pride. Additionally, Grade 3 students participated in an activity led by Physical Education teacher Ms Sneha Rajwade. Students were divided into groups and enacted the ousting of enemy forces from Tiger Hill, celebrating Vijay Diwas and understanding the LOC's importance.



Captain Sandeep Marathe



Colonel Sachin Nimbalkar

# It's time for Science Showdown



**In alignment with the New Education Policy 2020, PTV (ICSE) organised an exciting event titled "Science Showdown" on June 28 for Grade IV students, highlighting the benefits of interactive and practical learning. This innovative approach aimed to make difficult scientific concepts easy and engaging, igniting curiosity and fostering a deeper understanding of science.**

Students actively participated in creating their models, showcasing their understanding through working models, illustrative charts, and interactive games. This activity significantly impacted students' learning by promoting critical thinking, creativity, and collaboration. It allowed students to see the real-world applications of their lessons, thereby deepening their comprehension and retention of scientific concepts. All participants were given certificates to acknowledge their contributions and encourage future participation.

The event would not have been successful without the support of Principal Dr (Mrs) Arnavaz Bhagat, and the efforts of Grade IV science teachers: Ms Chetna Chhadwa, Ms Priyanka Jagwani, Ms Rajshree Krishnan, and Ms Rashmi Merchant.

**- Mrs Arunima Dave, H.O.D – Science, PTV (ICSE) Primary Section**

# Transforming teaching through storytelling



The "Write Your Own Story" workshop, conducted for the teachers of the Secondary Section of PTV ICSE on July 5, focused on enhancing storytelling skills and creative writing techniques. The Principal and the Secondary Teachers took an active part in the session designed to inspire and empower them to craft compelling narratives. The Principal, Dr (Mrs) Arnavaz Bhagat, gave her valuable suggestions, enhancing the workshop's effectiveness.




**The Grade 7 students of PTV (ICSE) showcased their understanding of rational numbers through an engaging and educational Math Culmination event on July 12. The culmination highlighted the students' grasp of rational numbers and their practical applications.**



Advik Desai



Deyaan Jangir



Veda Naik

**At the 19th CISCE Swimming Championship 2024, held at Jamnabai Narsee School on July 15 and 16, PTV (ICSE) students Advik Desai (Std. VIII), Deyaan Jangir (Std. V) and Veda Naik (Std. II) won laurels. While Advik earned silver medals in the Boys Under 14 category in 50m Butterfly Stroke and 50m Breaststroke, Deyaan secured a bronze medal in the Boys Under 12 category in 100m Breaststroke. Veda also achieved notable success, clinching a silver medal in the Girls Under 8 category in 50m Breaststroke and a bronze medal in 50m Freestyle.**




**Abhimanyu Shete (Std. IV A), studying in PTV (ICSE), won a silver medal in the "Badminton Association of Mumbai Upnagar District Championship" in the Under 11 category, held from June 30 to July 4 at Andheri Sports Complex, Mumbai.**

# Art is for Everyone

**PTV (ICSE) Primary Section organised a Culmination Activity on the topic 'Art is for Everyone' for students of Grade 5 on June 24. It helps learners develop their self-awareness, enthusiasm, energy, and positive outlook on lessons they will learn for the rest of their lives. It also facilitates improved verbal communication, teamwork, social skills, creativity, critical thinking, and performance abilities.**

The activity emphasised art's role in creativity and cultural appreciation. The students were given various avenues to express their artistic abilities and understand the intermingling of subject content, leading to their expanded view of the world and their contribution to making it a better place.

**-Mrs Florin Almeida, H.O.D – English, PTV (ICSE), Primary Section**






**PTV (ICSE) won the prestigious honour for "Excellence in Promoting Holistic Education" at the Leadership Excellence Conclave held on June 22 in Mumbai.**

# कालिदास दिन साजरा

आषाढस्य प्रथमदिवसे मेघदूतम् पठामः|
वारंवारं कविकुलगुरूं कालिदासं स्मरामः||
यस्य प्रज्ञा खलु भगवती लेखनं भाव- गर्भम् |
नाट्यं काव्यं मनसि निधाय तं कथं विस्मरामः ||

अशा या कवीश्रेष्ठ कलिदासांविषयी माहिती, त्यांच्या जीवनात घडलेल्या घटना गोष्टीच्या स्वरूपात ध्वनिक्षेपित कार्यक्रमाद्वारे पार्ले टिळक विद्यालय मराठी माध्यम माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांना सांगण्यात आल्या. तसेच कल्पनेतून साकारलेल्या कालिदासांच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण केला.




केवळ संस्कृत विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच नाही तर पाचवी ते दहावीतील सर्व विद्यार्थ्यांना त्या निमित्ताने या जगद्विख्यात कविश्वराची, त्यांच्या काही प्रसिद्ध श्लोकांद्वारे ओळख झाली.

कुमारसंभवम् रघुवंशम् ही दोन महाकाव्ये तर मालविकाग्निमित्रम् विक्रमोर्वशीयम् व अभिज्ञानशाकुन्तलम् ही तीन नाटके, मेघदूतम् ऋतुसंहारम् ही दोन खंड- काव्ये अशा सात कलाकृती म्हणजे कालिदासांनी संस्कृत साहित्यात रेखाटलेले जणू सप्तरंगी इंद्रधनुष्यच आहे.

# प्रज्ञा शोध परीक्षेत विद्यार्थ्यांचे यश



**पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत इयत्ता दुसरी ते चौथीचे विद्यार्थी प्रज्ञा शोध परीक्षेला मोठ्या संख्येने बसले होते.**

सर्वच विद्यार्थ्यांनी चांगले गुण मिळवून यश पटकावले. इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनींनी उत्कृष्ट कामगिरी केली. या स्पर्धा परीक्षेत इयत्ता दुसरीतून तावी विक्रम गायकवाड ही महाराष्ट्रातून चौथ्या तर अन्वी निलेश चोपडे ही महाराष्ट्रातून नवव्या क्रमांकावर आली.




**Students of grades 9 and 10 of PTV (ICSE) participated in the Bombay Scottish Model United Nations (MUN) on July 12 and 13. The students developed a deeper understanding of global issues through engaging and rigorous debates and research skills. Their active participation and insightful contributions enhanced their public speaking and critical thinking abilities and reflected their commitment to learning and growing as informed global citizens.**



**The Rotary Club of Bombay Airport organised the Interact Club Initiation Ceremony for 2024-25 on July 4 at the KES School. This service club provides youth with opportunities to engage in fun and meaningful service projects, develop leadership skills, and cultivate personal integrity. In this ceremony, PTV (ICSE), which is a part of the Interact Club, announced its Interact team members for the year: Nyssa Dharwadkar (Std. VIII C) – President, Drishyaa Satra (Std. VIII D) - Vice-President, Shreya Jong (Std. VIII D) – Treasurer, Gargi Satam (Std. VIII A) – Secretary, Anay Limaye (Std. VII A) - Sergeant-at-Arms, Saanavi Shirke (Std. VII C) – Director, and Kaavya Padhye (Std. VII B) – Director.**

# PTV (ICSE) students shine on Akashvani



**Students from Class 6 and 7 of PTV (ICSE) performed a play titled "जादू पाला पाचोळयाची", which focused on environment. The play was broadcast on Akashvani on July 7 at 6:30 p.m. and July 8 at 3:40 p.m.**

Under the expert guidance of Mr Tushar Desai (Sanjivan guide) and the rigorous training provided by dedicated teachers (Mrs Preeti Iswalkar, Mrs Janhvi Patil and Mrs Snehal Bhave), the students successfully recorded the play on June 28.

Arya Bhat (Std. VI A), Anshika Kale (Std. VII A), Arya Salagare (Std. VII A), Arjun Patwardhan (Std. VI A), Advaita Dixit (Std. VII B), Vallari Tawde (Std. VII B), and William Pasana (Std. VI A) were the participants.



# A sneak peek into the Egyptian culture...

The students of Grade 6 of PTV (ICSE) explored ancient Egyptian culture by making bracelets from cardboard. Students learnt about the significance of jewellery in ancient Egypt and created personalised bracelets. This hands-on project enhanced their understanding of ancient Egyptian culture while developing their artistic skills and creativity.



**आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक विभागातील इयत्ता ४थी च्या विद्यार्थ्यांनी मुख्याध्यापिका हर्षदा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील संगणक व योग शिक्षक सानिका वेळकर यांच्या मदतीने योगासने करून घेतली. शरीर व मनाची एकाग्रता राहण्यासाठी आपल्या जीवनात योगाचे महत्त्व त्यांनी समजावून सांगितले. बैठक स्थितीतील आसने तसेच ओमकार साधना आणि ध्यान विद्यार्थ्यांकडून करून घेतले.**

# विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती

मतदान कसे करावे, मतदानाची प्रक्रिया कशी चालते याबाबत इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली. जुलै महिन्यात पार्ले टिळक विद्यालय प्राथमिक मराठी शाळेत सालाबादप्रमाणे इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांची शालेय पंचायत निवडणूक पार पडली. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांनी गुप्त मतदान पद्धतीने आपल्या मतदानाचा हक्क बजावला व योग्य उमेदवार निवडून दिला. या निवडणुकीतून विजयी उमेदवारांना शालेय पंचायत प्रतिनिधी घोषित करण्यात आले. हे प्रतिनिधी नेहमीच शाळेत शिस्तबद्ध वातावरण कायम ठेवण्यास शिक्षकांना सहाय्य करतात.



# Soaking in spiritual splendour...



**Shree Manache Shlok, Stotra, and Abhang Recitation Competitions were held at PTVA's EMS, Andheri, on the auspicious occasions of Aashadhi Ekadashi and Guru Purnima in which students across all the standards participated with great enthusiasm. With the students mellifluously singing these spiritual verses, the school soaked in a fountain of divine bliss.**

The final round was judged by multifaceted personalities - an eminent writer/blogger and social activist, Smt. Sneha Bhatwadekar and a writer, poet, singer, keertankar Smt. Pranali Patwardhan. The judges explained the correct breathing techniques while chanting Shlokas, which led to the correct pronunciation. Both the judges appreciated the efforts of the young participants, their teachers, and their parents.

The winners were given away prizes and certificates at the hands of the judges.

**- Mrs Kaavya Rane, Music Teacher, PTVA's EMS, Andheri**

# Find The Magic of the Lost Temple with Sudha Murthy



**"The Magic of the Lost Temple" by Sudha Murthy is a delightful children's fictional novel that takes readers on an enchanting journey. The story revolves around Nooni, a city girl who visits her grandparents' village in Karnataka. Initially surprised by the slower pace of life, Nooni soon immerses herself in the gentle routine of the village. She learns to make papads, organise picnics and even discovers the joy of riding a bicycle with her newfound friends.**

However, things take an exciting turn when Nooni stumbles upon an ancient fable step well hidden in the heart of a forest. This discovery leads to an adventure of a lifetime, filled with mystery-history and unexpected twists. Sudha Murthy's storytelling is heartwarming, charming and unputdownable. She weaves magic through her words, inviting readers to explore the wonders of Nooni's world and the secrets hidden within the Lost Temple. If you enjoy beautifully illustrated, easy-to-read novels that improve vocabulary, "The Magic of the Lost Temple" is a perfect choice.

**- Ira Sane (Std. VIII), PTV (ICSE)**

# July 22 marks Pi Approximation Day

Mathematics, often called the language of the universe, holds special numbers that showcase its beauty, and one of the most captivating is Pi (π). Pi Approximation Day, celebrated on July 22 (22/7), honours this fascinating constant and the elegance of mathematics.

Pi, the ratio of a circle's circumference to its diameter, is an irrational number with an infinite, non-repeating decimal representation.



The date, July 22, is chosen because the fraction 22/7 serves as a well-known approximation of Pi, accurate to two decimal places (3.142857...). This approximation dates back to Archimedes, who employed it in his geometric methods to calculate Pi more precisely. This ratio is even engraved on Ludolf van Ceulen's tombstone. Ancient mathematicians used simple tools and techniques to estimate complex mathematical constants like π.

This day serves as an educational opportunity. Activities on this day often include exploring the significance of π in geometry, physics, and other sciences. Students can calculate the circumference and area of circles, learn about the history of π, and discover its applications in everyday life.

**- Tejomay Oke (Std. IX B), PTVEMS**

# Play and Learn



I was first introduced to the exhilarating game of chess by my cousins during the last summer vacation, and ever since, it hasn't stopped fascinating me. In chess, thinking about your opponent's next move can stretch your imagination and patience to the next level. While in play, we must be focused to make critical decisions and remain calm. I have started applying the values I learnt from chess in my everyday life. Chess has taught me patience in stressful situations and enhanced my problem-solving skills. It has sharpened my mind to think critically about a situation before reacting. This has helped me to be a better student. I have also learned to be more disciplined in my routine behaviour.

Friends, I urge you to take up chess as a hobby and welcome patience and discipline into your lives.

**- Yuvaan Raut (Std. V C), PTV (ICSE)**

**International Chess Day was celebrated on July 20**

# Shlok Karande tops PTVA's EMS, Andheri, in the scholarship exam

**"Think Big, Dream Big, Work Hard..." advised Chief Guest and PTVA Director Shri Pramod Lele to the young scholars of PTVA's English Medium School, Andheri (Grade V and VI) in a felicitation function as their success in the Pre-Upper Primary Scholarship examination was celebrated in the school on July 20.**

Principal Mrs Mrinalini Mhetre welcomed the gathering. She described scholarship achievement as a collective accomplishment of the students, their parents, and teachers. Shri Lele delivered a motivational speech to the students, emphasising the importance of participating in competitive exams and encouraging future aspirants to maintain a positive attitude towards learning.

The ceremony continued with



Shri Lele distributing certificates and gifts to the scholarship recipients. Teachers who provided in-house scholarship coaching, Mrs Pratiksha Parshekar, Ms Shweta Yadav, Mrs Charita Kulkarni, and Mr Dinesh Tripathi, were felicitated.

While school topper Shlok Karande and the second rank holder Swaraj Jadhav spoke about their study schedule, their parents, Mrs Manisha Karande and Ms Samiksha Jadhav, expressed gratitude towards the teachers.

**- Swaraj Jadhav (Std. VI A), PTVA's EMS, Andheri**

# Man is known by the company he keeps



**International Friendship Day, celebrated on July 30, highlights the significance of friends and friendship.**

While we don't have the choice to choose our parents and relatives, we do have it when it comes to friends. It's up to us whether to choose a good or bad company. Friends must make efforts to nourish their friendship.

A good friend is always with you in both good and bad times. To win a friendship, a person should be loyal, trustworthy, selfless and affectionate. They should listen well and share their joys and sorrows with their friends. One should be interested in other people rather than trying to get others interested in oneself.

Besides, true friends always give you their shoulders whenever you need them. Long-term friendships indicate a strong sense of self-respect and selflessness.

One-sided friendships are not meaningful. Friendships are a two-way street; nurturing them takes effort and dedication from both parties. We must make time to develop this vital bond.

**- Chinmayee Naravane (Std. IX B), PTVEMS**

# Thank you, Parents!

**On this Parents' Day, let me thank my mom and dad for their unconditional love. It is tough to repay that. But I always try to help to reduce their efforts.**

Every weekend, I help my mother with household work, especially laundry. I know how to operate the washing machine; my mother has taught me well. I fill the machine with soiled clothes, add the detergent liquid and start the machine. Once done, I dry them on the drying rack. I always try to help my mother by doing this, but I know that is not enough as she does many things daily.

This year, I made a greeting card



for my parents and gifted them flowers, expressing my gratitude.

**- Riyana Sarangdhar (Std. IV C), PTVEMS**

# Understanding Vitamin M

**PTVEMS (Secondary) arranged a lecture for the students of Std. VIII on Money Management on July 18. Mr Siddharth Shirodkar, an expert in stock trading and financial education and an alumnus of the school, delivered the lecture.**

Mr Shirodkar covered topics like budgeting, saving, and ethical spending. Real-world applications and the importance of starting early were emphasised. The session was well-received, leaving the students inspired and better equipped to handle their finances.

Following the lecture, a small skit on online fraud was performed by Mrs Anjali Potdar and Mrs Beena Pitale from Mumbai Grahak Panchayat to make the students aware of the hazards of online shopping and gaming. The events also marked the inauguration of the Consumer Club for the academic year 2024-25.

Consumer Club Advisors Mrs Madhura Dabir and Mrs Harsha Chavan pulled off this event smoothly.






Parth Adarkar



Ishan More

**Eight students from Std. VI and 14 students from Std. IX of PTVEMS became eligible for the practicals of Dr Homi Bhabha Balvaidnyanik Science Talent Search Competition conducted by the Greater Bombay Science Teachers' Association. Of them, two students, Parth Adarkar (Std. VI) and Ishan More (Std. IX), made the cut for the project level and bagged bronze medals.**




Story board contributed by Anagha Vinod (Std. V D), PTV (ICSE)

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ संस्कृत परीक्षेत विद्यार्थ्यांचे सुयश

**परांजपे विद्यालय माध्यमिक शाळेतील प्रियांका मोरे हिने टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे आयोजित संस्कृत भाषा प्रवेश परीक्षेत केंद्रातून प्रथम येण्याचा मान पटकावला.**

प्रियांका मोरे हिने १०० पैकी ९६ गुण मिळवून केंद्रातून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्याबरोबरच या परीक्षेस शाळेतील एकूण ३० विद्यार्थी बसले होते. त्यापैकी १२ विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य श्रेणी प्राप्त झाली. तर १३ विद्यार्थ्यांना प्रथम श्रेणी, २ विद्यार्थ्यांना द्वितीय श्रेणी प्राप्त झाली. या विद्यार्थ्यांना संस्कृत शिक्षिका सौ. पटवर्धन यांनी मार्गदर्शन केले होते.

# PTVEMS (Secondary) inaugurates its English Literary Club - Enrich

**At PTVEMS (Secondary), the inauguration of the English Literary Club - Enrich was held on July 19 in the school hall, officiated by Dr (Mrs) Neena Nair from the Department of English, Valia College. The programme began with the lighting of the ceremonial lamp by the Chief Guest, the school's headmistress, Mrs Smita Biwalkar, and other staff members.**

Dr Nair spoke about the beauty and timelessness of stories as a way to learn. Later, a poem called 'The Power of One' was recited by Lucas Kinny (Std. V).

The Literary Club conducted a 'Just A Minute' competition for students of Std. VII and VIII, where participants had to speak for one minute on a given topic. The winners of this competition were Saanvi Phatak (1st, Std. VII A), Om Bendre (2nd, Std. VIII B) and Jivisha Vesavkar (2nd, Std. VII A), and Purvasha Singh (3rd, Std. VIII B). The students delivered their prize-winning speeches again, to the awe of everyone present.

Literary Club Advisors Mrs Vandana Menon, Mrs Anuradha Phatak, and Mrs Rathi Pillai ensured the smooth conduct of this programme.



**Saanvi Phatak won the first prize in 'Just a Minute' competition**

Editor : Mrs Janhavi Khandekar | Supported by Thanevaibhav and KYT Team